पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८
मा. विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक : ३
सभावृत्तांत

दिनांक : १८/०५/२०१२ वेळ : दुपारी ३ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार, दिनांक - १८/०५/२०१२ रोजी दुपारी ३:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा. प्रसाद शेट्टी - सभापती
२. मा. ननवरे जितेंद्र बाबा
३. मा. सुपे आशा रविंद्र
४. मा. ॲड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५. मा. शितोळे शैलजा बाबुराव
६. मा. नेटके सुमन राजेंद्र
७. मा. विनोद जयवंत नढे

याशिवाय मा.सावंत - सह आयुक्त,मा.मुंढे-सहा.आयुक्त, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.दांगट - कार्य. अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दखल करुन घेणेत आले.

विषय क्र. :- ३) प्रभाग क्र.१३ निगडी गावठाण से.क्र.२१ मधील योजना क्र.९ व १० जवळील मोकळया जागेत बहुउद्देशीय इमारत बांधणेबाबत..मा.सुमन नेटके,मा.नितीन लांडगे यांचा प्रस्ताव..

विषय क्र. :- ४) तरतुद करणेबाबत..मा.सुमन नेटके, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव..

विषय क्र.:- ५) वॉर्डातील चालु कामातुन नवीन प्रभागात कामे करणेबाबत..मा.विनोद नढे,मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव..

विषय क्र. :- ६) शाळा समिती समन्वय समिती मान्यताबाबत..मा.नितीन लांडगे,मा.विनोद नढे यांचा प्रस्ताव..

विषय क्र. :- ७) वेतनातील तफावत दूर करणेबाबत..मा.जितेंद्र ननवरे,मा.नितीन लांडगे यांचा प्रस्ताव..

विषय क्र. :-८) तालेरा रुग्णालय येथे स्थापत्यविषयक दुरुस्ती देखभाल व सुधारणांची कामे करणेबाबत..मा.सुमन नेटके,मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव..

----------

दिनांक ०७ / ०५ / २०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक :- १५ विषय क्रमांक :- १
दिनांक :- १८/०५/२०१२ विभाग- जकात
सुचक :- मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा.विनोद नढे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जकात/१०/कावि/९९/२०१२ दि.१९/३/२०१२
विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका जकात नियम २०११ चे अनुसूची १ व २ मधील दर समानिकरणाबाबत..

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १६ विषय क्रमांक :- २
दिनांक :- १८/०५/२०१२ विभाग- स्थापत्य उद्यान
सुचक :- मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा.नितीन लांडगे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/जा/कावि/१३/२०१२ दि.९/५/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

भोसरी आरक्षण क्र. ४१४ येथे उद्यान विकसित करणेकामी रक्कम रुपये - ४९,३३,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.</u>

ठराव क्रमांक :- १७ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- १८/०५/२०१२
सुचक :- मा.सुमन नेटके अनुमोदक :- मा.नितीन लांडगे
संदर्भ :- मा.सुमन नेटके,मा.नितीन लांडगे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.१३ निगडी गावठाण सेक्टर क्र.२१ मधील योजना क्र.९ व १० जवळील मोकळया जागेत बहुउद्देशीय इमारत (खोले पुर्नवसन) बांधणेच्या कामाचा सन २०१२ - १३ चे अंदाजपत्रकात समावेश करणेत आलेला आहे. परंतु सदरचे इमारतीचे काम अत्यंत दाटवस्ती असलेल्या ठिकाणी आहे व या जागेचे आजूबाजुला सध्या भरपुर दुकाने असलेमुळे तसेच ही जागा आतील बाजुला असलेमुळे या इमारतीमधील दुकाने चालणे अत्यंत कठीण आहे. या जागेचे बाजुचे नागरिकांची सदरची जागा मोकळी ठेवुन मुलांना खेळण्यासाठी उद्यान विकसीत करणे अशी मागणी आहे. तरी सदरचे इमारतीचे काम रद्द करुन याच कामाचे आदेशा मधुन प्रभाग क्र. १३ निगडी गावठाण मधील साईनाथनगर मधील अंतर्गत रस्त्यांना पावसाचे पाण्यासाठी पाईप टाकणे, मधुकर पवळे ग्राऊंड विकसित करणे, श्रीकृष्ण मंदिरामागील नाला “व्ही ” शेप करणे व प्रभागातील अन्य स्थापत्य विषयक कामे करणेत यावीत.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १८ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- १८/०५/२०१२
सुचक :- मा.सुमन नेटके अनुमोदक :- मा.शैलजा शितोळे
संदर्भ :- मा,सुमन नेटके,मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव -

वॉर्ड क्र.१८ मध्ये एम.बी.कॅम्प झोपडपट्टीचा भाग असुन डिसेंबर २०१० मध्ये सदर झोपडपट्टी घोषित करणेत आलेली आहे. सदर झोपडपट्टीमध्ये पाण्याच्या लाईन्स या कमी (ग्रामपंचायत काळातील) व्यासाच्या व खुप जुन्या (pvc) असल्याने वारंवार गळती होत असुन नवीन पाईप लाईन टाकणे आवश्यक आहे. त्यासाठी सन २०१२-१३ चे अंदाजपत्रकात र.रु. ५०,००,०००/- तरतुद करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच वाढत्या लोकसंख्येचा व भविष्यातील पाण्याच्या कमतरतेचा विचार करता-साईनगर मामुर्डी येथे पाण्याच्या टाकीसाठी र.रु. ५०,००,०००/- (पन्नास लाख) तरतुद करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक :- १९ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- १८/०५/२०१२
सुचक :- मा.विनोद नढे अनुमोदक :- मा.आशा सुपे
संदर्भ :- मा.विनोद नढे,मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव -

वॉर्ड क्र.७६ मधील रहाटणी येथे सर्वे नं. ६ मधील डि.पी.रस्ता नि.क्र.४२/३५/३१ २०११-१२ कामाअंतर्गत (नवीन) प्रभाग क्र.४८ मधील डि.पी. रस्ते विकसीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच (जुना) वॉर्ड क्र.७७ श्रीनगर मधील साई कॉलनी निविदा क्र.४१/२/१५४/२०११-१२ कामाअंतर्गत (नवीन ) प्रभाग क्र.४८ मधील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे आवश्यक असल्याने सदर कामे करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक :- २० विषय क्रमांक :- ६
दिनांक :- १८/०५/२०१२
सुचक :- मा.नितीन लांडगे अनुमोदक :- मा.विनोद नढे
संदर्भ :- मा.नितीन लांडगे,मा.विनोद नढे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत १८ माध्यमिक विद्यालये आहेत. मनपा माध्यमिक विभागाचे कामकाज एस.एस.कोड (शाळा संहिता) नुसार चालते. खाजगी शाळातील सेवेच्या शर्ती नियमातील १९८१ मधील शाळा समितीच्या कामाप्रमाणे तुकडयानुसार आवश्यक शिक्षक खाजगी शाळेप्रमाणे स्कूल कमिटी, शालेय समिती मार्फत निवड होऊन आदेश देतात. सर्व शाळांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्याकरिता एक समन्वय समिती असणे आवश्यक आहे. माध्यमिक विभागाची अस्तित्वात असलेली गठीत केलेली निवड समितीस खाजगी शाळेतील स्कुल कमिटी, समन्वय समितीप्रमाणे कामकाज करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक :- २१ विषय क्रमांक :- ७
दिनांक :- १८/०५/२०१२
सुचक :- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक :- मा.नितीन लांडगे
संदर्भ :- मा.जितेंद्र ननावरे,मा.नितीन लांडगे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम - २०१० (मा.विधी समिती ठराव क्र.१५०,१५१ दि.८.१२.२०१० व मा.महापालिका सभा ठराव क्र.१११३ दि.१८.३.२०११) चे परिशिष्ट - ३अ (नियम -३ ) मध्ये प्रशासकीय सेवा अंतर्गत येणारे संवर्ग नमूद केलेले असून त्यामध्ये लिपिक संवर्ग व त्यामध्ये येणारी पदे यामध्ये लिपिक टंकलेखक/ माहिती नोंदणीकारलिपिक /लिपिक/लेखा लिपिक/ रोखपाल/ भांडारपाल/ लेजर क्लार्क/स्टोअर किपर/दुरध्वनी चालक/समयलेखक

इत्यादींचा समावेश करणेत आलेला आहे. लेखासंवर्गामध्ये उपलेखापाल या पदापासून नेमणुक करणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यालयीन कामकाजाचे सोईसाठी व्यवस्थापन या संवर्गात प्रशासकीय सेवा व लेखा सेवा असे दोन स्वतंत्र विभाग करुन त्यामध्ये कामकाजासाठी कार्यरत कर्मचा-यांचे पदानुसार संवर्ग संबोधिणेत आले आहे. परंतु संवर्ग म्हणजे एक स्वतंत्र घटक म्हणून मंजूर केलेली, एखाद्या सेवेतील किंवा एखाद्या सेवेच्या भागातील पदसंख्या अशी महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ मध्ये व्याख्या दिलेली आहे. लिपिक हे पद असून लिपिक हा संवर्ग आहे. त्यामुळेच प्रशासकीय सेवेतील लिपिकांच्या यादी असलेल्या लिपिकांना लेखा सेवेत पदोन्नती (उपलेखापाल) देणेत आलेली आहे. म्हणजेच जरी प्रशासकीय व लेखा अशी लिपिकांची स्वतंत्र यादी तयार केलेली असली तरी प्रत्यक्षात लिपिक हा संवर्ग आहे. म्हणजेच दोन्ही याद्या जरी स्वतंत्र असल्या तरी त्यांची वेतनश्रेणी व कामाचे स्वरुप हे सारखेच आहे. त्यामुळे जसे अलिकडेच काही प्रशासकीय लिपिकांची लेखा सेवेत पदोन्नती देणेत आलेली आहे त्या आधारेच वेतन तफावत दूर करणेकामी मिळणा-या लाभापासून वंचीत राहिलेल्या लेखा सेवेतील/संवर्गातील लिपिकांना प्रशासकीय सेवेतील/संवर्गातील लिपिकाचे देय वेतनाप्रमाणे निश्चिती करुन वेतन तफावत दूर करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक :- २२ विषय क्रमांक :- ८

दिनांक :- १८/०५/२०१२

सुचक :- मा.सुमन नेटके अनुमोदक :- मा.आशा सुपे

संदर्भ :- मा.सुमन नेटके,मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या चिंचवड जुना वॉर्ड क्र.६६ तालेरा रुग्णालय येथे स्थापत्यविषयक दुरुस्ती देखभाल व सुधारणांची कामे करणे (निविदा क्रमांक G४B/६/१२/११-१२) सदर कामाची निविदा रक्कम रुपये २३३३९७३/- इतकी असुन कामाचा निविदा दर १६.३०% कमी इतका आहे. निविदा रक्कमे इतके काम पुर्ण झाले आहे. परंतु चिंचवड, वाल्हेकरवाडी, थेरगाव व पिंपरी भागातील नागरीकांचे सोईसाठी तालेरा रुग्णालयाचे मागणीनुसार उर्वरीत देखभाल दुरुस्तीची कामे विषयांकीत कामातुनच करणेसाठी कामास रक्कम रुपये ४००००००/- (र.रु. १६६६०२७ चे वाढीव खर्चासह) सुधारीत खर्चास प्रशासकिय मान्यता देणेत येत आहे..

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

(खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली)

सुचक :- मा.नितीन लांडगे अनुमोदक :- मा.जितेंद्र ननावरे

पिंपरी चिंचवड मनपाच्या जकात विभागाचे प्रमुख श्री. अशोक मुंढे व त्यांचे सहकारी यांनी मनपाच्या जकात वाढीचे उत्पन्नाकामी केलेल्या अथक परिश्रमाचे आणि कौतुकास्पद कामगिरीबद्दल अभिनंदन करणेत यावे.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

(पिंपरी चिंचवड मनपाच्या जकात विभागाचे प्रमुख श्री.अशोक मुंढे व त्यांचे सहकारी यांचे जकात वाढीचे उत्पन्नाकामी केलेल्या कामगिरीबद्दल अभिनंदन करणेत येत असल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.)

यानंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **प्रसाद शेट्टी** )
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/८२२/२०१२
दिनांक - २३/०५/२०१२ चे लगत

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत-सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.